**प्रेस नोट** दिनांक २८/०२/२०२५

०१) ईश्वर बाळू पवार, वय ५६ वर्षे, पद गटविकास अधिकारी, नेमणूक पंचायत समिती, पाथरी ता.पाथरी जि. परभणी मूळ राहणार मुक्काम तिवासपाडा पोस्ट साखरे ता.विक्रमगड जि.पालघर (वर्ग १ ग्रामविकास विभाग) ०२) गोवर्धन मधुकर बडे,वय ३० वर्षे, पद सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, नेमणूक पंचायत समिती कार्यालय, पाथरी मूळ रा.केकर जवळा, ता.पैठण जि.छत्रपती संभाजीनगर ( बाह्यस्रोत कंत्राटी ग्रामविकास विभाग) हे ३५०००/- रूपयांची लाचमागणी व स्विकारले प्रकरणी ओरीबीच्या जाळयात

| | |
|---|---|
| युनिट | लाप्रवि युनिट परभणी |
| पो.स्टे.गुरनं व कलम | पो.स्टे.पाथरी गुरनं ९८/२०२५ कलम ७, ७ अ, १२ भ्र.प्र.अधि १९८८ |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | ०१) ईश्वर बाळू पवार, वय ५६ वर्षे, पद गटविकास अधिकारी, नेमणूक पंचायत समिती, पाथरी ता.पाथरी जि.परभणी मूळ राहणार मुक्काम तिवासपाडा पोस्ट साखरे ता.विक्रमगड जि.पालघर (वर्ग १ ग्रामविकास विभाग)<br>०२) गोवर्धन मधुकर बडे,वय ३० वर्षे, पद सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, नेमणूक पंचायत समिती कार्यालय, पाथरी मूळ रा.केकर जवळा, ता.पैठण जि.छत्रपती संभाजीनगर ( बाह्यस्रोत कंत्राटी ) |
| स्विकारलेली लाच रक्कम | ३५०००/- रु |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी पंचायत समिती पाथरी येथे झरी ग्रामपंचायत अंतर्गत असलेले ७ विहिरींचे वर्क ऑर्डर मिळणे साठी प्रस्ताव दाखल केलेले आहेत. ते वर्क ऑर्डर मंजूर करण्यासाठी एका विहिरीचे ५००० रु याप्रमाणे ३५००० रु द्यावे लागतील असे म्हणून लोकसेवक ईश्वर पवार यांनी लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दि. २७/०२/२०२५ रोजी लाप्रवि परभणी येथे दिली.

तक्रारदार यांनी दिनांक २७/०२/२०२५ रोजी दिलेल्या तकारीवरुन पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक ईश्वर पवार यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांनी दाखल केलेल्या ७ विहिरींचे वर्क ऑर्डरकरिता एका विहिरीचे ५००० रु याप्रमाणे ३५००० रु लाचेची मागणी पंचासमक्ष करून लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शवली.

तक्रारदार हे लाचेची रक्कम देण्यासाठी पंचायत समिती पाथरी येथे पंचासह गेले असता आरोपी गोवर्धन बडे यांनी तक्रारदार यांना सांगितले की, बि.डी.ओ साहेबांनी पैसे माझ्याकडे द्यायला सांगितले आहे. त्यावरून आरोपी लोकसेवक गोवर्धन बडे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडून ३५०००/- रुपये लाचेची रक्कम आरोपी लोकसेवक ईश्वर पवार यांचे सांगणेवरून स्वत: स्विकारले असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले आहे. लोकसेवक ईश्वर पवार व आरोपी गोवर्धन बडे यांना देखील ताब्यात घेण्यात आले असून दोघांचे विरुद्ध पो.स्टे.पाथरी येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| सापळा पथक | सदरची सापळा कार्यवाही श्री.संदीप पालवे,पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड परिक्षेत्र,नांदेड. डॉ.संजय तुंगार,अप्पर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड परिक्षेत्र,नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री.अशोक इप्पर,पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि.परभणी, पो.नि. अल्ताफ मुलाणी, पो.नि.बसवेश्वर जकीकोरे , सपोउपनि निलपत्रेवार , पोह रवींद्र भूमकर, सीमा चाटे, पो.अंमलदार नामदेव आदमे, अतुल कदम, कल्याण नागरगोजे, शाम बोधनकर, चापोह जे.जे. कदम, नरवाडे यांनी पार पाडली. |
| तपास अधिकारी | श्री.अल्ताफ मुलाणी, पोलीस निरीक्षक, लाप्रवि परभणी. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी. | |
| दुरध्वनी क्रमांक :- 02452220597 टोल फ्री क्रमांक – 1064 ऑनलाईन ॲप acbmaharastra.net | |
| spacbnanded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |
| **WhatsApp No. 9272111064** | |

पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो परभणी

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी

Scanned with OKEN Scanner